महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय
१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१
दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी. क्र.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/ उमाशि १ प्रवेश /पुवि /२०१७-१८/ 3२४८ Dt. 04 /05/2018.

- 5 MAY 2018

प्रति,
सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य,
उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे / अहमदनगर / सोलापूर.

विषयः- सन २०१८-१९ मधील इ. १२ वी प्रवेशाबाबत.

संदर्भः- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे पत्र क्रमांक संकीर्ण – २०१८ / प्र.क्र. १३८/एस.डी.-२/ दि. ०३ मे २०१८ चे पत्र.

उपरोक्त शासनाचे संदर्भिय विषयाचे पत्रानुसार आपणांस सर्वांना कळविण्यांत येते की, विद्यार्थ्यांकडून दरवर्षी विविध कारणास्तव इ. १२ वी मध्ये उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळण्याबाबत मागणी होते. यानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये खालील कारणांसाठी इ. १२ वी करिता विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक विद्यालये बदलून देण्याची कार्यवाही उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालये स्तरावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१.सध्या विद्यार्थी शिक्षण घेत असलेले महाविद्यालय घरापासून लांब असणे.
२.पालकांची बदली होणे.
३.वैद्यकीय कारणास्तव राहत असलेल्या परिसरात कनिष्ठ महाविद्यालये बदलून मिळणे.
४.शाखा बदलून मिळणे.
५.विद्यार्थ्यांच्या राहण्याचा पत्ता बदलणे.
६.इ.१२ वी मध्ये विद्यार्थ्यांस बोर्ड बदलायचे असल्यास.

तथापि ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या डाटाबेसमध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालय बदलल्यानंतर आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालयांनी करणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे